अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड




www.surajyadigital.com बुधवार दि. ९ नोव्हेंबर २०२२ ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ४३ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# वाचाळवीर बोलले सात

## उचलली जीभ लागले बरळायला,

## अंगलट आले की मोकळे माध्यमांवर खापर फोडायला

✔ सुराज्य/सोलापूर

**सत्ता आली की मरणारा माणूसही होतो जित्ता. त्यातही खुर्चीचा मिळाला भत्ता की भल्याभल्यांची वरखाली होऊ लागते (बुध्दी)मत्ता. त्यातून हरवते जिभेवरची सत्ता. त्यानंतर कालपरवापर्यंत हवाहवासा असणाराही वाटू लागतो कडीपत्ता. मग त्याला सापडतो वाचाळवीराचा पत्ता... आणि कोणालाही देऊ लागतो शब्दांचा लत्ता. काहीसा हाच कित्ता सध्या महाराष्ट्रात सत्ताधारी पुढारी गिरवत असल्याचे पाहयला मिळत आहे. त्यातूनच बेताल वक्तव्य करणारे वाचाळवीर पुढे येतात आणि उचलली जीभ की लागले बरळायला आणि आले अंगलट की मोकळे माध्यमांच्या माथी खापर फोडायला; असे चित्र निर्माण झाले आहे.**

सभा जिंकण्यासाठी किंवा टाळ्या मिळवण्यासाठी अथवा आक्रमकपणा दाखवण्यासाठी भाषणात शिवराळ भाषा स्वत: वापरायची, त्यातून वाद निर्माण झाला आणि वक्तव्य अंगलट आले की त्याचे खापर माध्यमांच्या माथ्यावर फोडून नामानिराळे होण्याचा नवा उपद्व्याप महाराष्ट्रात सुरू झाला आहे. कोणाविषयी बोलावे? काय बोलावे? बोलताना भाषा कशी असावी? ज्याच्याविषयी बोलतो ती व्यक्ती कोण आहे? आपली बोलण्याची तितकी कुवत आहे का? यापैकी कोणत्याही बाबींचा विचार न करता प्रचारकी थाटात पुढारी बोलून मोकळे होतात. मात्र त्यानंतर राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो, त्याचा नाहक संपूर्ण राज्याला होतो; याचे भान मात्र कोणीही ठेवत नसल्याचे चित्र राज्यात पाहण्यास मिळत आहे.

### संजय शिरसट म्हणतात संयज राऊतांना मूर्ख



एकनाथ शिंदेंनी शिवसेनेत बंडखोरी केल्यानंतर खा.संजय राऊत यांनी बंडखोरांवर निशाणा साधला होता. त्यांना प्रत्युत्तर देताना आमदार संजय शिरसट यांनी पातळी सोडली होती. 'संजय राऊत हा मूर्ख माणूस आहे. उद्या जर कुणी म्हणालं छत्रपती शिवाजी महाराज, बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांचं नाव वापरू नका, तर कसं चालेल?' असे विधान करून संजय शिरसट यांनी वाद ओढवून घेतला होता.

### ये भी कुछ कम नहीं....


जसे सत्ताधारी मंडळी तोंडाळ होऊन टीका करत आहेत, तसे विरोधकही फार मवाळ आहेत असे नाही. सध्या तुरुंगात असलेले शिवसेनेचे खासदार संजय राऊत हेसुध्दा बाहेर असताना सुसाट सुटले होते. त्यांच्याही वाणीला भान राहिले नव्हते. राष्ट्रवादीचे आ.अमोल मिटकरी अधूनमधून अगळपगळ बोलतच असतात. समोरुन टीका झाली की त्या टीकेला उत्तर देताना महाविकास आघाडीतील नेत्यांचीही जिभ अनेकवेळा वळवळलेली महाराष्ट्राने पाहिली आहे.

### अब्दुलभाई ऐसा क्यों..?



'पन्नास खोके एकदम ओके'ने 'अब्दुलभाई को बडी चोट लगी है'असे दिसते. 'खोके' हा शब्द ऐकताच 'सत्तारभाई को गुस्सा आया' आणि त्यांनी पूर्ण प्रश्न समजून न घेताच 'सुप्रिया सुळे इतकी भिकार...झाली असेल तर त्यांनाही देऊ', ऐसे भाई बोले और घड्याळपार्टी मे हल्ला मच गया... घड्याळवाले लोगा शोर मचाने लगे... शोर इतना बढ गया की एकनाथ शिंदे साब भी सोचने लगे... बाद मे स्वारी बोले तो भी लोग सुनने को तैय्यार नही... अब क्या करना...क्या होईंगा...?' अशी अवस्था सत्तारभाईंची झाली.

### आयटम गर्लचा प्रसाद



तोलूनमोलून बोलणारे भाजपचे प्रसाद लाडसुध्दा काही दिवसांपूर्वी असेच काहीसे बडबडले. चित्रपट बॉक्स ऑफिसवर चालावा म्हणून चित्रपटात एक आयटम साँग असते. अगदी तशाच प्रकारे भास्कर जाधव हे आयटम गर्ल आहेत, असा हल्लाबोल २१ ऑक्टोबर रोजी प्रसाद लाड यांनी भास्कर जाधवांविरोधात केला होता. गदारोळ माजल्यानंतर देवेंद्रभाऊंनी लाडालाडाने लाड यांना जपून बोलण्याचा प्रसाद दिला. तरीही भास्करराव मात्र अद्याप लालबुंदच दिसत आहेत.

### आरक्षणाची खाज आली अंगलट



मराठा समाजाकडून आरक्षणाची मागणी केली जात आहे. या सगळ्यामागचा कर्ता करविता कोण आहे, हे तुम्हा-आम्हाला समजणे गरजेचे आहे. सगळ्यांना याबाबत माहिती आहे, पण कोणी बोलत नाही. दोनवेळा आरक्षण गेल्यानंतर मराठा समाज गप्प राहिला. पण आता राज्यात सत्तांतर होताच तुम्हाला लगेच मराठा आरक्षणाची खाज सुटली, असे विधान २६ सप्टेंबर रोजी करून आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी वाद ओढवून घेतला. वाद इतका वाढला की शेवटी चंद्रकांत पाटलांना सावंतांच्या बाजूने उतरावे लागले.

### पार्क मैदानाचे विघ्न, आदित्यचे लग्न



दसरा मेळावा शिवाजी पार्कवरच घेण्यासाठी ठाकरे गट उच्च न्यायालयात गेला होता. उच्च न्यायालयाने ठाकरे गटाला परवानगी देताच नेहमीप्रमाणे राणेपुत्र नितेश संतापले. २३ सप्टेंबर रोजी केलेल्या ट्विटमध्ये ते म्हणतात की, फक्त मैदानावर सभा घेण्याची परवानगीच मिळाली ना?? मला वाटलं आदित्यच लग्न मुलीशी जमलं म्हणून जल्लोष करत असतील नाचे कुठले!! या ट्विटला अनेकांनी ट्रोल केले.

### शेर-ए-संजय



शिंदे गटातील आमदार संजय गायकवाड यांनी १६ सप्टेंबर रोजी भर पत्रकार परिषदेत शायराना अंदाजात विरोधकांवर टीका केली होती. 'येत्या स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विरोधक तुमची राजकीय कोंडी करू शकतात, असे वाटते का?' या प्रश्नावर 'वीरों के दुश्मन होते है, शेरों के भी दुश्मन होते हैं, हि** का कोई शत्रू होता हैं क्या? असा शेर पेश केला आणि शेरास सव्वाशेर पध्दतीने टीकेचे धनी होऊन बसले.

### डॉक्टर गुलाबराव पाटील



सध्या पाणीपुरवठा मंत्री असणारे बंडखोर आमदार गुलाबराव पाटील कधी कोणाला कशाचे विशेषण लावतील सांगता येत नाही. त्यांनी चक्क स्त्रीरोगतज्ञावरुनही मुक्ताफळे उधळली होती. मंत्र्यांपेक्षा डॉक्टर बरे. स्त्रीरोग तज्ञ कधीच हातपाय बघत नाही आणि हातपाय बघणारा कधीही स्त्रीरोग तज्ज्ञ होऊ शकत नाही, असे विधान करणारे डॉक्टर गुलाबराव पाटील यांनी ' तू गोधडीत पण नव्हता, तेव्हापासून आम्ही शिवसेनेत आहोत', अशा शब्दात आदित्य ठाकरेंवर टीका केली होती.

---

## यांत्रिक पद्धतीने दररोज होणारे रस्ता सफाईचे टार्गेट अपूर्ण

✔ सुराज्य/सोलापूर

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सोलापूर महापालिकेच्या रोज १२० किलो मीटरच्या रस्त्याची यांत्रिकी पद्धतीने (रोड स्वीपरद्वारे) साफसफाई करणे आणि कचरा उचलण्याचा कामाचा मक्ता देण्यात आला आहे. मात्र कराराप्रमाणे दैनंदिन उद्दिष्ट कंपनीकडून पूर्ण केले जात नसल्याची माहिती पुढे आली आहे.

स्वच्छ सोलापूर ... धुळमुक्त सोलापूरसाठी शहरातील काही मध्यवर्ती रस्ते रोड स्वीपर मशीनच्या सहाय्याने सफाई करण्यात येत आहे. वर्षाला ५ कोटी रुपये प्रमाणे पाचवर्षांसाठी साधारणत: २५ कोटींचा हा मक्ता देण्यात आला आहे. त्यांना प्रति कि.मी. ११५० रुपये देण्यात येते. शहरातील मोठे रस्ते व स्मार्ट सिटीने तयार केलेल्या रस्त्याची या मशीनद्वारे स्वच्छता करण्यात येत आहे. रोडवरील तसेच दुभाजकमधील मातीसह कचरा उचलणे, फुटपाथवरील स्वच्छता मशीनद्वारे करण्यात यावी, शहरातील मुख्य चौक या मशीनच्या द्वारे स्वच्छता करण्याचे करारात ठरले आहे. रोज १२० किलो मीटरच्या रस्त्याची यांत्रिकी पद्धतीने साफसफाई करणे अपेक्षित आहे. मात्र कराराप्रमाणे काम पूर्ण केले जात नसल्याची माहिती आहे.



### कराराप्रमाणे काम न झाल्यास दंड आकारणार : घोलप

दररोज रोड स्वीपरच्या माध्यमातून १२० किलोमीटर लांबीचे रस्ते साफसफाई संबंधित मक्तेदाराने करावयाची आहे. कराराप्रमाणे हे काम होते की नाही यासंदर्भात आढावा घेण्यात येईल. जीपीएस रिडींग नुसार बिल दिले जाणार आहे. यामुळे जेवढे रस्ते सफाई केली तेवढेच बिल संबंधितांना अदा केला जाणार आहे. कराराप्रमाणे काम न झाल्यास प्रसंगी दंड आकारण्यात येणार आहे, असेही महापालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांनी स्पष्ट केले.

## मोडनिंबजवळ कंटेनरच्या धडकेने महिला ठार

✔ सुराज्य/सोलापूर

वेगाने जाणाऱ्या कंटेनरच्या धडकेने दुचाकीच्या पाठीमागे बसलेली महिला गंभीर जखमी होऊन मरण पावली. हा अपघात पुणे महामार्गावरील मोडनिंब जवळ सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडला.

गोकर्णा राम बुवा (वय ३५ रा.धानोरी ता.लोहारा जि.उस्मानाबाद) असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे. त्या काल सायंकाळी पतीची दुचाकी पाठीमागे बसून पुण्याहून आपल्या गावाकडे निघाल्या होत्या. मोडनिंब चौकाच्या पुढे काही अंतरावर पाठीमागून कंटेनर धडकल्याने दोघे जखमी झाले. त्यांना सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्यापैकी गोकर्णा बुवा या मंगळवारी सकाळी मरण पावल्या.या अपघाताचे प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.



## इंग्लंडविरोधातल्या सेमीफायनल सामन्यापूर्वी रोहितला दुखापत

✔ **नवी दिल्ली** : टीम इंडियाच्या कॅम्पमधून एक चिंता वाढविणारी बातमी आहे. क्रीडाविश्वातील माहितीनुसार, कर्णधार रोहित शर्मा जखमी झाला आहे. ॲडलेडमध्ये नेटवर फलंदाजी करताना त्याला दुखापत झाली, त्यानंतर त्याला दुखापतीमुळे वेदना होत असल्याचा व्हिडिओ समोर आला आहे. टी-२० विश्वचषक २०२२ मध्ये इंग्लंडविरुद्धच्या उपांत्य फेरीपूर्वी रोहितची दुखापत ही टीम इंडियासाठी एखाद्या वाईट बातमीपेक्षा कमी नाही.

मात्र, ही दुखापत किती गंभीर आहे? याबाबत सध्या काही सांगता येणार नाही. टीमच्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी रोहित शर्माच्या दुखापतीची दखल घेतली आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील उपांत्य फेरीचा सामना ॲडलेडमध्ये १० नोव्हेंबरला होणार आहे. या सामन्यासाठी रोहित नेटमध्ये फलंदाजीचा सराव करत होता. रोहितची दुखापत फारशी गंभीर नसावी, अशी आशा बाळगायला हवी. आता प्रश्न असा आहे की रोहित शर्माला कोणत्या प्रकारची दुखापत झाली? त्याला कुठे दुखापत झाली? मिळालेल्या माहितीनुसार, भारतीय कर्णधाराला फलंदाजीच्या सरावात उजव्या हाताला दुखापत झाली. या दुखापतीनंतर त्याला वेदना होताना दिसल्या. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून संघाचे फिजिओ धावत धावत नेटवर गेले, त्यांना रोहित शर्माच्या दुखापतीची माहिती मिळाली.

## टिळक नगरात तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

✔ **सोलापूर** : मजरेवाडी परिसरातील टिळक नगरात राहणाऱ्या एका २६ वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली. इस्माईल अय्युब पटेल (वय २६) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. काल रात्री आठ वाजेच्या सुमारास त्याने घरातील छताच्या लोखंडी हुकाला दोरीने गळफास घेतला होता.मयत इस्माईल हा अविवाहित असून त्याच्या पश्चात आई-वडील आणि एक भाऊ असा परिवार आहे. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली. मानसिक आजारातून त्याने हा प्रकार केला. हवालदार कटके तपास करीत आहेत.

## जखमी टेम्पो चालकाचा उपचारादरम्यान मृत्यू

✔ **सोलापूर** : पुणे महामार्गावरील लांबोटी येथे दुचाकीच्या धडकेत जखमी झालेले अर्जुन सुरेश गायकवाड (वय ५० रा.बुधवार पेठ सोलापूर) हे शासकिय रुग्णालयात उपचार घेताना मंगळवारी सकाळी मरण पावले. ते आयशर टेम्पो घेऊन मोहोळ ते सोलापूरच्या दिशेने निघाले होते.३१ आक्टोबरच्या सायंकाळी लांबोटी येथे वाहन उभी करून चहासाठी खाली उतरले होते. त्यावेळी दुचाकी धडकेने ते जखमी झाले होते. त्यानंतर त्यांना सोलापुचत दाखल करण्यात आले होते. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

---

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आपल्या वेळीं आर्थिक आरक्षण असतं तर...?

| कल्याण |
|---|
| 889-58-558 |

| मेन बाजार |
|---|
| 380-10-479 |

## ५० खोक्यांच्या टीकेमुळे मानहानीचा खटला दाखल

✔ सुराज्य/मुंबई

**शिंदे गटाचे नेते आणि राज्याचे मंत्री अब्दुल सत्तार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांना शिवीगाळ केल्यामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. यानंतर राज्यभरात राष्ट्रवादीने आक्रमक भूमिका घेतली आहे. दरम्यान खासदार सुप्रिया सुळे यांनी अब्दुल सत्तार यांच्यावर पन्नास खोक्यांवरून टीका केली होती, या टीकेला प्रत्युत्तर देताना मंत्री अब्दुल सत्तार यांनी शिवीगाळ केली.**

### ▪ मविआ सरकारमधील तीन बडे नेते अडचणीत

मात्र सत्तारांच्या वक्तव्यामुळे त्यांच्यावर टीकेची झोड उठवली जात आहे, दरम्यान शिंदे गटानेही त्यांचे वक्तव्य चुकीचे असल्याचे म्हटले आहे. मात्र महाविकास आघाडी सरकारमधील नेत्यांना ५० खोक्यांवरील टीकेवरून इशारा दिला आहे.


महाविकास आघाडी सरकारमधील मंत्री सातत्याने शिंदे गटातील आमदारांवर ५० खोके एकदम ओके म्हणत टीका करत असतात. मात्र या टीकेमुळे शिंदे गटातील आमदारही आता वैतागले आहेत. दरम्यान ही टीका करण्यात अजित पवार, सुप्रिया सुळे आणि आदित्य ठाकरे हे आघाडीवर आहेत. त्यामुळे शिवसेनेचे ४० आमदार आणि १० अपक्ष आमदार अशा एकूण ५० आमदारांच्यावतीने या तीनही आमदारांविरोधात मानहानीचा खटला दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. अशी माहिती शिंदे गटातील प्रवक्ते शिवतारे यांनी दिली आहे.



अजित पवार, सुप्रिया सुळे आणि आदित्य ठाकरे या तीन नेत्यांनी शिंदे गटातील नेत्यांची बदनामी केली म्हणून जाहीरपणे माफी मागावी अन्यथा बदनामीच्या खटल्याला कायदेशीर मार्गाने सामोरे जा, असा इशारा शिंदे गटाने दिला आहे. शिंदे गटाचे प्रवक्ते विजय शिवतारे यांनी पत्रकार परिषद घेत शिंदे गटाची अधिकृत भूमिका जाहीर केली आहे. अब्दुल सतार यांनी केलेल्या विधानाचे कोणीही समर्थन करणार नाही, त्यांचे विधान चुकीचेच आहे.

मात्र हे विधान त्यांच्या तोंडून का बाहेर आलं याचाही विचार व्हायला हवा. वारंवार ५० खोके घेतल्याचा आरोप करत बदनामी करण्याचा प्रयत्न होत आहे. त्यातूनच संयम सुटल्यानेच अब्दुल सत्तार यांचे स्लिप ऑफ टंग झाले, असं विजय शिवतारे म्हणाले. तसेच अजित पवार, सुप्रिया सुळे आणि आदित्य ठाकरे यांनी अशी बदनामी केल्याने त्यांनी कोर्टात ५० खोके घेतल्याचे पुरावे सादर करावेत. अन्यथा २५०० कोटींच्या अब्रू नुकसानीच्या दाव्याच्या नोटिसा दिल्या जातील, असही शिवतारे यांनी स्पष्ट केले आहे.

सुराज्य सोलापूर



पाहिजेत

ग्राफीक डिझायनर

- उमेदवार पदवीधर असावा.
- कोरल ड्रॉ, फोटोशॉप, इन डिझाईन आवश्यक.
- पेज लेआऊट, सर्व प्रकारचे जाहिरात डिझाईन आणि मराठी टायपिंग अनिवार्य.
- रात्रपाळीत काम करण्याची तयारी असावी.
- आकर्षक पगार मिळेल.

ऑफीसचा पत्ता

१५७/१५८ औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर ४१३००३

Email : dailysurajyaoffice@gmail.com या ईमेलवर अर्ज करावेत!